**पोलीस अधीक्षक कार्यालय , सातारा**

९३, मल्हारपेठ, सातारा - ४१५ ००१ (Maharashtra)
कार्यालय -०२१६२ २३२२२५ फॅक्स ०२१६२ २३०२३२ (ई-मेल sp.satara@mahapolice.gov.in)


---

क्रमांक - ९३७/वानिशा/बंदी आदेश/२०२५ दिनांक – ३१/१२/२०२५

---

## प्रेसनोट

सातारा शहरात शाहु स्टेडियम येथे ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दि.०१/०१/२०२६ ते दि.०४/०१/२०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेले आहे. या संमेलना दरम्यान भुविकास चौक ते एस.टी.स्टँड जाणारे सार्वजनीक रोडवर व एस.टी.स्टँड इनगेट समोर वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता असलेने पोवई नाका, राधिका सिग्नल, एस. टी. स्टँड इनगेट, आऊटगेट, शाहु स्टेडिअम, भुविकास चौक दरम्यान वाहतुकीचे व्यव्रस्थेत बदल करणे अत्यावश्यक आहे.

मी तुषार दोशी भापोसे,पोलीस अधीक्षकं सातारा, मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये दि.३१/१२/२०२५ रोजीचे ००.०५ वा. पासुन ते दि.०४/०१/२०२६ रोजी ११.५५ वा पर्यत खालीलप्रमाणे वाहतुकीत बदल करीत आहे याची नोंद घ्यावी.

**वाहतुकीकरीता बंदी घालणेत आलेला मार्ग-**

**दि.३१/१२/२०२५ रोजीचे ००.०५ वा.पासुन खालील नमुद मार्गावर वाहतुकीकरीता बंदी करणेत येत आहे.**

१) पोवई नाका व राधिका सिग्नल, एस टी स्टॅड येथुन भुविकास चौकाकडे येणारे सर्व वाहनांना भुविकास चौकातुन परत एस टी स्टॅड कडे वळणेस मनाई असेल. **(एस टी बसेस, शासकीय वाहने व ॲम्बुलन्स वगळुन)**

२) मोळाचा ओढा, करंजे नाका येथुन भुविकास चौकाकडे येणारे सर्व वाहनांना शाहु स्टेडियम समोरुन एस टी स्टॅड कडे जाण्यास मनाई असेल. **(एस टी बसेस, शासकीय वाहने व ॲम्बुलन्स वगळुन)**

३) वाढे फाटा कडुन येणारी वाहने भुविकास चौक मार्गे शाहु स्टेडियम, एस.टी.स्टँड कडे जाण्यास मनाई असेल. **(एस टी बसेस, शासकीय वाहने व ॲम्बुलन्स वगळुन)**

४) भुविकास चौक येथुन एस टी स्टॅडकडे जाणेसाठी सर्व वाहनांना **(एस टी बसेस, शासकीय वाहने व ॲम्बुलन्स वगळुन)** मनाई असेल.

**वाहतुकीकरीता पर्यायी मार्ग-**

१) पोवई नाका व राधिका सिग्नल, एस टी स्टॅड कडुन येणारी सर्व वाहने भुविकास चौक, जुना आर.टी.ओ.चौक, पारंगे चौक, हजेरीमाळ मैदान मार्गे एस टी स्टॅड कडे जातील.

२) मोळाचा ओढा, करंजे नाका तसेच वाढे फाटा येथुन एस टी स्टॅड कडे येणारे सर्व वाहने ही जुना आर.टी.ओ.चौक, पारंगे चौक, हजेरीमाळ मैदान मार्गे एस टी स्टॅड कडे जातील.

३) पारंगे चौक येथुन एस टी स्टॅड कडे जाणारा रोड हा एकेरी वाहतुक मार्ग राहिल.

**वाहनांसाठी पार्किंगची ठिकाणे**

१) हजेरीमाळ मैदान (पारंगे चौक शेजारी) चार चाकी वाहने पार्क करवीत.

२) शासकीय तंत्रनिकेतन महाविध्यालय (शाहु स्टेडियम समोर) दोन चाकी वाहने पार्क करवीत.

३) कंग्राळकर असोसिएट (लॉडमार्क) च्या मोकळया जागेत दोन चाकी व चार चाकी वाहने पार्क करवीत.

४) पोलीस परेड मैदान लगत रोडच्या बाजुला दोन चाकी वाहने पार्क करवीत.

५) छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय याठिकाणी दोन चाकी व चार चाकी वाहने पार्क करवीत.

तरी या बदलाची सर्व नागरिकांनी नोंद घेवुन पोलीस दलास सहकार्य करावे.